प्रेसनोट दिनांक २८/०५/२०१७

## पोलीसांवर प्राणघातक हल्ला करणारी अल्पवयीन मुले पोलीसांच्या जाळयात

## .............. निगडी पोलीसांची कामगिरी ..........

निगडी पोलीस स्टेशनचे हद्दीत दिवसें दिवस वाहन चोरीचे प्रमाण वाढल्याने निगडी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री शंकर आवताडे यांनी तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना वाहन चोरीचे गुन्हयांना आळा बसावा या करीता ॲक्शन प्लॅन तयार करुन तपास पथकातील कर्मचा-यांची दोन स्वतंत्र टिम तयार करुन त्यांना खब-या मार्फत माहिती काढण्यास वेळोवेळी सुचना देवुन मार्गदर्शन केले आहे.

त्याप्रमाणे तपास पथकाचे अधिकारी व कर्मचारी हे नियमित वाहन चोरी अनुषंगाने हद्दीमध्ये गस्त घालुन सापळे रचुन आरोपींचा शोध घेत होते. तपास पथकातील कर्मचारी पो.हवा. नारायण जाधव, यांना खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की,देहूरोड येथे पोलीसांवर प्राणघातक हल्ला करणारी काही मुले त्यांचे जवळील ॲव्हेंजर गाडीवर देहूरोड कडून निगडीच्या दिशेने येणार असल्याची बातमी मिळाल्याने सदरची बातमी मा. पोलीस निरीक्षक श्री. शंकर आवताडे यांना कळवून त्यांचे मार्गदर्शनाखाली निगडी तपास पथकातील स्टाफची दोन पथके तयार करून भक्ती शक्ती चौक निगडी पुणे येथे सापळा लावला असता दुपारी ०१/०० वा चे सुमारास मिळालेल्या बातमीप्रमाणे एका काळया रंगाच्या ॲव्हेंजर गाडीवर तीन मुले देहूरोड कडून निगडीच्या दिशेने येत असताना दिसल्याने त्यांना भक्ती शक्ती चौकात थांबवून त्यांना ताब्यात घेवून निगडी पोलीस ठाणे येथे आणले असता त्यांचेकडे सखोल तपास करता त्यांनी ८ ते १० दिवसांपुर्वी तळेगाव दाभाडे पोलीस ठाणेचे हददीत जबरदस्तीने आय २० चारचाकी कार हत्याराचा धाक दाखवून चोरुन नेली होती. त्यागुन्हयातील पाहिजे असलेले व देहूरोड पोलीस ठाणेचे हददीमध्ये पोलीसांच्या अंगावर चारचाकी गाडी घालवून प्राणघातक हल्ला करणारे हिच ती मुले असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. तसेच निगडी पोलीस ठाणेचे हददीतून दोन व पुणे शहरातून एक अशा तीन मोटार सायकली १,४०,०००/- रू किंमतीच्या जप्त करून निगडी पोलीस ठाणेकडील दोन वाहनचोरीचे गुन्हे व पुणे शहरातील एक असे तीन वाहनचोरीचे व तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे पुणे,देहूरोड पोलीस ठाणे कडील प्रत्येकी एक असे एकूण ५ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

सदरची कामगिरी मा.अप्पर पोलीस आयुक्त सो उत्तर प्रादेशिक विभाग श्री शशिकांत शिंदे,मा. पोलीस उपआयुक्त सो श्री गणेश शिंदे, मा.सहायक पोलीस आयुक्त सो पिंपरी विभाग श्री.राम मांडुरके,वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजयकुमार पळसुले निगडी पोलीस ठाणे पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गुन्हे श्री.शंकर आवताडे, पोलीस हवालदार नारायण जाधव, शरीफ मुलाणी,जमीर तांबोळी,किशोर पढेर, सागर शेडगे, विलास केकाण यांनी केली आहे.